# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २८/०७/२०२४ (रविवार) सकाळ**

---

### अवैधरीत्या घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

पोस्टे पारशिवनी अंतर्गत मौजा घोगरा महादेव परसिर पेंच नदीचा पात्रात दि. २६/०७/२०२४ चे १९.०० वा. ते १९.५५ वा. दरम्यान **आरोपी नामे– सागर युवराज चव्हाण, वय २५ वर्षे रा. इंदिरानगर कन्हान** याने आपले हातात लोखंडी तलवार सारखे शस्त्र हातात घेवुन हवेत फिरवताना दिसुन आल्याने आरोपीस ताब्यात घेवुन आरोपीकडुन तलवारीसारखे लोखंडी शस्त्र ज्याची पात्याची लांबी ३० से मी पात्याची मुठी पासून रूंदी ४.५ सेमी व समोरील भागाची रूंदी ६.५ सेमी असून समोरील बाजूस वळण असलेला व लोखंडी मुठ असलेला ज्याचे मुठीची लांबी १४ सेमी असलेला कि ५००/ रू चा माल मिळून आल्याने सदरचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून आरोपीविरूद्ध पोस्टे पारशिवनी येथे कलम ४/ २५ भाहका सहकलम १३५ मपोका अन्वये गुन्हा नोंद केला असुन आरोपीस सुचनापत्रावर सोडण्यात आले आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ रामराव पवार हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर